नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

नागपूर सुधार प्रन्यास सांस्कृतिक संकुल, तिसरा माळा, ना.सु.प्र.
जलतरण तलावा समोर, उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर ४४० ०३३
दूरध्वनी / फॅक्स क्र ०७१२–२२२३३११.

क्रमांक : इमा.अभि.(नामप्रविप्रा)/१०ee नागपूर, दिनांक :३१/०६/२०१७.

प्रति, अप

मे. डी.एच.एल इंन्फ्राबुल्स तर्फे भागीदार
श्री. संजीव जैस्वाल व ईतर
नवजिवन कॉलनी, वर्धा रोड, नागपूर ४४००२२

विषय :– मौजा गोटाडपांजरी, खसरा क्रमांक १७, तालुका नागपूर (ग्रामिण) या जागेवरील भुखंड क्रमांक ७ वरील प्रस्तावित इमारत बांधकाम नकाशे मंजुरीबाबत.

संदर्भ :– १. आपले दिनांक ०९.१२.२०१६, १८.०२.२०१७ व २६.०४.२०१७ रोजीचा अर्ज.
२. आपले दिनांक २२.०६.२०१७ रोजीचा अर्ज.
३. नागपूर सुधार प्रन्यास कार्यालयीन परिपत्रक क्रमांक अधी. अभि. /परिपत्रक/६०५ दिनांक २.२.२०१५.

उपरोक्त विषयाला अनुसरून कळविण्यात येते की, मौजा गोटाडपांजरी, खसरा क्रमांक **१७**, तालुका नागपूर (ग्रामिण) या जागेवरील भुखंड क्रमांक **७**, वरील प्रस्तावित इमारत बांधकाम नकाशे मंजुरीकरीता आपले दिनांक ०९.१२.२०१६, १८.०२.२०१७, २६.०४.२०१७ व २२.०६.२०१७ रोजीचे अर्जान्वये आपण सादर केलेल्या बांधकाम नकाशांना अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीवर दिनांक **०९.०७.२०१७** तात्पुरती मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

प्रचलित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली–२०१३ व प्रारूप विकास नियंत्रण नियमावली मधील तरतुद क्रमांक ६.२.६.१ प्रमाणे मुख्य अग्निशमन अधिकारी, नागपूर महानगरपालिका यांनी प्रमाणित केलेले ना हरकत प्रमाणपत्र आणि प्रमाणित मंजुर नकाशे सादर करणे आवश्यक आहे.

अग्निशमन विभागाची मंजुरी प्राप्त करून घेणेकरिता मंजूर केलेल्या इमारतीचे नकाशाच्या पाच प्रती या पत्रासह **Maharashtra Fire Prevention and Life Safety Measures Act-2006** आणि **नॅशनल बिल्डींग कोड** मधील तरतुदीप्रमाणे अग्नीशमन विभागाची मान्यता प्राप्त करून ना हरकत प्रमाणपत्रासह नकाशे सादर करण्याकरिता या पत्रासह संलग्न आहे.

वरील तरतुदीप्रमाणे अग्नीशमन विभागाची मान्यता/शिक्यासह प्राप्त करून नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालयास सादर करावे. तद्नंतरच नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडून गुणवत्तेनुसार पुढील कार्यवाही करता येणे शक्य होईल.

कृपया याची नोंद घ्यावी.

सहपत्र– वरीलप्रमाणे.

इमारत अभियंता
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.

<u>प्रतिलिपी</u> :– मुख्य अग्नीशमन अधिकारी, नागपूर महानगरपालिका, सिव्हील लाईन्स, नागपूर यांना माहितीकरिता अग्रेषित.